मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२३। पान १

# थकबाकीदारांचे धाबे दणाणले; ६८ मालमत्ता जप्त

## जप्ती टाळायची असल्यास थकीत कर भरण्याचे महापालिकेचे आवाहन



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे. वारंवार थकीत कर भरण्याचे आवाहन करूनही कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या ६८ जणांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. त्यामुळे आता मालमत्ता धारकांचे धाबे दणाणले आहेत. जप्ती पथक दारात जाताच ६२ जणांनी तत्काळ धनादेश अथवा रोख पैसे भरले. थकबाकीदारांना आपली मालमत्ता जप्त होऊ नये, यासाठी त्वरित कराचा भरणा करावा, असे आवाहन कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा ६ लाख ७ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाव्दारे जनजागृती, महत्त्वाच्या चौकात होर्डिंग्ज, रिल्स स्पर्धा, सोशल मीडियाचा प्रभावी वापर याचबरोबर प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा customised sms पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे २०२३-२४ च्या पहिल्या सहामाहीत ५८५ कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. आता वारंवार आवाहन करूनही कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांना १ ऑक्टोबरपासून दोन टक्के विलंब शुल्क लागू झाले आहे. आता थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी तीव्र मोहीम हाती घेण्यात आली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात आत्तापर्यंत कर संकलन विभागाने ४१ हजार, ३०७ जणांना जप्ती नोटीसा तर ३६ हजार ७१९ मालमत्ता धारकांना जप्ती पत्रे धाडली आहेत. या मालमत्ता धारकांकडे तब्बल ६७१ कोटी रुपयांचा कर थकीत आहे. नोटीसा देऊनही कर न भरणाऱ्या सुरूवातीला बिगर निवासी व मोकळी जप्त करण्यास सुरुवात केली आहे. ३ ऑक्टोबरपासून जप्ती माहिती सुरू करण्यात आली असून २ हजार १८४ मालमत्ता धारकांना जप्ती अधिपत्र दिली आहेत. यापैकी १ हजार ९४८ मालमत्ता जप्ती अंमल बजावणीसाठी पात्र आहेत. यामध्ये ६८ मालमत्तांची जप्ती करण्यात आली. जप्ती करताच ६२ जणांनी तत्काळ ८७ लाख ३७ हजार रुपये रोख अथवा धनादेश जमा केले. तर सहा मालमत्ता या सील करण्यात आल्या आहेत.

### कर संकलनाचे व्हाट्सअप चॅनेल...

» महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या विविध सवलत योजना, माहिती यासह जनजागृती, थकबाकीदारांची माहितीही या व्हाट्सअप चॅनेल वरून प्रसारित करण्यात येणार आहे. जास्तीत -जास्त नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## थेरगाव येथील वेंगसरकर ॲकडमीतील तीन खेळाडूंची १९ वर्षाखालील संघात निवड





**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील व्हेरॉक वेंगसरकर अकादमीतील तीन खेळाडूंची १९ वर्षाखालील महाराष्ट्र महिला क्रीकेट संघात निवड झाली. त्यातील खुशी मुल्ला हिच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी आली आहे. तिच्यासोबत आचल अग्रवाल, मयुरी थोरात हिचा संघात समावेश झाला आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी या खेळाडूंचा कौतुक करत त्यांना सामन्यासाठी शुभेच्छा दिल्या. खासदार श्रीरंग बारणे यांनी नगरसेवक असताना दूरदृष्टी ठेवून थेरगावमध्ये क्रिकेट अकॅडमी उभारण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांची मदत घेतली. महापालिकेने थेरगाव येथे व्हेरॉक वेंगसरकर अकादमी सुरु केली. तिथे विविध दर्जे दार सुविधा खेळाडूंसाठी उपलब्ध करून दिल्या. त्याचा खेळाडूंना मोठा लाभ होत आहे. अकॅडमीतील ऋतूराज गायकवाडची आयपीएलमध्ये निवड झाली होती. आता १९ वर्षांखालील महाराष्ट्र महिला क्रीकेट संघाचे कर्णधारपद अकादमीतील खुशीकडे आले आहे. यामुळे पिंपरी-चिंचवडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. खासदार बारणे म्हणाले, अकादमीचा शहरातील खेळाडूंना मोठा फायदा होत आहे. अनेक खेळाडू देश, राज्य पातळीवर शहराचे नाव रोषण करत आहेत. अकादमीतील तिघींची महिला संघत निवड होणे आणि कर्णधारपदही येणे ही शहरासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे. आचल अग्रवाल या खेळाडूचे मला विशेष कौतुक वाटते. दररोज ६० किलोमीटर प्रवास करून नियमितपणे सरावासाठी उपस्थित राहून मेहनत घेऊन पुढे जात आहे. खूशी मुल्ला हिची कर्णधार म्हणून निवड झाली. या सर्व खेळाडूंचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे मी अभिनंदन करतो.

# शहर काँग्रेसचा कार्यअहवाल प्रदेश काँग्रेसकडे सादर करणार : गोपाळ तिवारी

## देशात काँग्रेसची विचारसरणी मान्य करणाऱ्यांची संख्या भरपूर

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** अखिल भारतीय काँग्रेस कमिटी आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने मागील दोन वर्षात दिलेले आदेश पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्हा काँग्रेस कमिटीने कशा पद्धतीने पाळले आहेत. याविषयीचा पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली मागील काळात झालेल्या विविध आंदोलने, सभा, बैठकांमध्ये कोणी किती योगदान दिले आहे, याबाबतचा कार्य अहवाल घेऊन प्रदेश काँग्रेस कमिटीकडे सादर करण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस, निरीक्षक गोपाळ तिवारी यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली. खराळवाडी, पिंपरी येथील शहर काँग्रेसच्या कार्यालयात गोपाळ तिवारी यांनी आयोजित केलेल्या बैठकी वेळी ते बोलत होते. यावेळी महिला काँग्रेस नेत्या श्रीमती शामला सोनावणे, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, शिक्षण मंडळाचे माजी सभापती अभिमन्यु दहितूले, झोपडपट्टी सेल अध्यक्ष बी. बी. शिंदे, सेवादल अध्यक्ष वीरेंद्र गायकवाड, भोसरी



ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष विजय ओव्हाळ, रोजगार व स्वयंरोजगार अध्यक्ष विशाल सरवदे, डॉक्टर सेल अध्यक्षा डॉ. मनीषा गरुड, भाजी विक्रेते सेल अध्यक्षा गौरी शेलार, उपाध्यक्षा अर्चना राऊत, उमेश बनसोडे, व्यापारी सेल अध्यक्ष अमरजित सिंग पोठीवाल, भाऊसाहेब मुगुटमल, तारिक रिझवी, बाबा बनसोडे, सौरभ शिंदे, जुबेर खान, मेहबूब शेख, हरिश डोळस, गौतम ओव्हाळ, मिलिंद फडतरे, इरफान शेख, सतीश भोसले, पांडुरंग जगताप, उपस्थित होते. तिवारी म्हणाले की, काँग्रेस कमिटी मध्ये विविध पदांसाठी दावे प्रति दावे केले जातात. हे काँग्रेसमध्ये अद्यापही लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहे. याचा अर्थ काँग्रेसची विचारसरणी मान्य असणाऱ्या नागरिकांची संख्या भरपूर आहे. परंतु आपण एखाद्या पदाला दावा करीत असताना यापूर्वी आपण पक्षाने दिलेले आदेश वेळोवेळी पाळले आहेत का? विविध आंदोलन मोर्चा बैठकांमध्ये आपण सहभागी झाले आहेत का ? ज्या पदांबाबत आपण दावा करीत आहोत त्या पदाची जबाबदारी पेलण्याची आपली क्षमता आहे का? याची देखील सखोल माहिती घेऊन त्याचा अहवाल प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानासाहेब पटोले यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे, अशी ही माहिती तिवारी यांनी यावेळी दिली.

# 'रनाथॉन ऑफ होप'मध्ये धावले ४ हजार स्पर्धक

## रोटरी क्लब ऑफ़ निगडीच्यावतीने रनाथॉन ऑफ होप मॅरेथॉनचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** रोटरी क्लब ऑफ निगडीच्या वतीने दिनांक ८ रोजी आयोजित केलेल्या रनाथॉन ऑफ होप या मॅरेथॉनमध्ये ४ हजार स्पर्धेक धावले आहेत. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी रोटरी क्लब ३१३१ च्या प्रांतपाल मंजू फडके, बँक ऑफ महाराष्ट्रचे महाव्यवस्थापक राजेश कुमार, झोनल व्यवस्थापक राहुल वाघमारे, रोटरी क्लब निगडीचे अध्यक्ष हरबिंदरसिंग दुल्लत, सचिव शशांक फडके, रनथॉनचे संचालक विजय काळभोर आदी संचालक, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी बॉइज ४




सिनेमाच्या कलाकारांनी स्पर्धेला हजेरी लावून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह सीटीवन कंस्ट्रक्शनचे संचालक संदीप आगरवाल, युनिक डेल्टाफोर्सचे चेअरमन प्रभाकर साळुंखे, बॉश कंपनीचे विपणन प्रमुख हेमंत जाधव, मनिपाल रुग्णालयाचे ललित सासणे, नेक्सझू सायकलचे व्यवसाय प्रमुख चिंतामणी सरदेसाई, अल्ट्राटेक सिमेंटचे विभागीय प्रमुख रवी सिंग, पीसीईटी इंफिनिटी रेडिओच्या माधुरी ढमाले, पोलिस वाहतूक शाखा यांचे विशेष सहकार्य लाभले. या स्पर्धेत केनियातील ६ जण, पोलीस दलातील १५० पोलीस अधिकारी व कर्मचारी, एनडीआरएफ आणि सीआरपीएफचे जवानांनी विशेष सहभाग नोंदवला. या स्पर्धेच्या माध्यमातून संकलित होणाऱ्या निधीतून रोटरी क्लब ऑफ़ निगडी तर्फे ग्रामीण भागात काही समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये आनंदी शाळा, आनंदी ग्राम, वैद्यकीय प्रकल्पाचा समावेश आहे. यासाठी हा निधी खर्च केला जाणार असल्याची माहिती रनाथॉनचे संचालक विजय काळभोर यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष हरबिंदर सिंग यांनी केले. सूत्रसंचालन रेडियो सीटीचे आरजे केदार जोशी यांनी केले तर आभार विजय काळभोर यांनी मानले. २१ किमी :- पुरूष गटात विवेक मोरे (वेळ १ तास, ६ मिनिटे, ४९ सेकंद), अक्षय कुमार (१ :७:१), विवेक यादव (१:८:३८), महिला- प्राजक्ता गोडबोले (१:२५:९), प्रमिला पाटील (१:३६:८), शीतल भंडारी(१:३८:४१) केनियाच्या सुझान चेबेट यांना विशेष बक्षीस दिले.

# काँग्रेस पक्षामध्ये गटबाजी नाही!

## धंगेकर आजारी असल्याने बैठकीला आले नाही : नाना पटोले

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुणे शहर काँग्रेस कार्यालयात प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली पाश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यापूर्वी राज्यातील अनेक घटना बाबत नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली.



यावेळी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार विश्वजीत कदम, आमदार प्रणिती शिंदे, पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. मात्र या बैठकीला कसबा विधानसभा मतदार संघाचे आमदार रविंद्र धंगेकर हे उपस्थित नव्हते तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेल्या बॅनरवर फोटो देखील नव्हता. त्यामुळे काँग्रेसमध्ये गटबाजी सुरू का? त्या प्रश्नावर नाना पटोले म्हणाले की, रविंद्र धंगेकर हे आजारी आहेत. त्यामुळे बैठकीला येऊ शकले नाही. पण मीडियाला आमची जास्त काळजी दिसत आहे. तुम्ही भाजपकडे बघा, काँग्रेसमध्ये कुठलीही गटबाजी नाही. जर गटबाजी राहिली असती तर आम्ही कसबा कसा जिंकलो असतो. कसब्याची जागा आम्ही जिकणार असं म्हटलं होतं आणि आम्ही जिंकून दाखविले. अशी भूमिका मांडत काँग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मागील काही दिवसापूर्वी आगामी लोकसभा निवडणुकीत पुणे लोकसभा मतदार संघातून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे निवडणुक लढविणार अशी चर्चा सुरू होती. ती चर्चा थांबत नाही तोवर काँग्रेस पक्षाच्या नेत्या प्रियंका गांधीदेखील पुण्यामधून निवडणुक लढविणार असल्याची चर्चा सुरु झाली. या सर्व घडामोडी दरम्यान आज पुण्यात काँग्रेस पक्षाची पाश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठकीच आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रियांका गांधी पुणे लोकसभा निवडणुक लढणार का? असा प्रश्न नाना पटोले यांना विचारण्यात आला असता त्यांनी, आपण त्यांना पत्र पाठवून द्या अशी मिश्किलपणे टिप्पणी करताच एकच हशा पिकला. तर याबाबत हाय कमांड निर्णय घेईल अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली. तसेच यावेळी नाना पटोले म्हणाले की,आगामी लोकसभा निवडणुक लक्षात घेऊन विभागीय निहाय बैठका आयोजित केल्या आहेत. त्यामध्ये पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आम्हाला आगामी निवडणुकीत यश निश्चित मिळेल. त्याच बरोबर आम्ही जागावाटपासंदर्भात मेरिटनुसार निर्णय घेणार असून पश्चिम महाराष्ट्राबाबत सांगायचे झाल्यास महाविकास आघाडी सर्व जागा जिंकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### खर्चाची मर्यादा १.५० हजार असावी

**» केंद्र आणि राज्य सरकार विरोधात जनतेमध्ये प्रचंड रोष आहे. त्यामुळे महापालिका, जिल्हा परिषद यांच्या निवडणुक होत नाही. राज्य सरकार आणि प्रशासक कारभार पाहत आहे. यामुळे सर्व सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे. पण आगामी निवडणुका कधी ही झाल्यास केंद्र आणि राज्य सरकारला जनता निश्चित जागा दाखवेल, तर राहुल गांधींना भाजप रावण म्हणून उल्लेख करत आहे. पण महागाई, बेरोजगारी कुणी वाढवली. तर रावण प्रवृत्तीच्या केंद्र आणि राज्य सरकारने वाढवली आहे. त्यामुळे या रावण प्रवृत्तीच्या सरकाराच दहन करायचं आहे. अशा शब्दात केंद्र आणि राज्य सरकारच्या कारभारावर त्यांनी टीका केली.**

# शिळ्या कडीला उत आणण्यात काहीच अर्थ नाही!

## टोल मुद्द्यावरुन सुषमा अंधारेंचा मनसेला टोला

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
टोलचा मुद्दा काढून महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेच्या मुद्द्यावरील लक्ष कोणी भटकवू नये. सध्या आरोग्याचा प्रश्न महत्वाचा आहे, टोलचा नव्हे. उगाच शिळ्या कडीला उत आणण्यात काही अर्थ नाही, असं म्हणत अप्रत्यक्षरीत्या मनसेला उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी टोला लगावला आहे. त्या पुण्याच्या वडगाव मावळमध्ये बोलत होत्या. वडगाव मावळ या ठिकाणी जनरल मोटरच्या कर्मचाऱ्यांकडून बेमुदत साखळी उपोषण सुरू आहे. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याने त्यांच्यावर ही वेळ आलेली आहे. त्यांच्या साखळी उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी सुषमा अंधारे यांनी भेट दिली. कामगारांचा प्रश्न लवकर न सोडवल्यास येत्या १२ तारखेला आम्ही तळेगाव एमआयडीसीला ताळे लावू असा इशाराही त्यांनी दिला आहे. अंधारे प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.




राज्यातील आरोग्य व्यवस्था ही व्हेंटिलेटरवर गेलेली आहे. पुण्यातील ससून असो की जळगाव, नाशिक येथील परिस्थिती. वर्षभराचं हाफकीनचं २२६ कोटींचं बिल आरोग्यमंत्र्यांनी वेळेत दिल असतं तर त्या-त्या संबंधित रुग्णालयाला औषध पुरवठा झाला असता आणि हे बळी गेले नसते, असं मत सुषमा अंधारे यांनी व्यक्त केलं आहे. त्या पुढे म्हणाल्या की, हे बळी शासकीय हलगर्जीपणामुळे गेलेले असून आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे. हे सर्व सुरू असताना काही जण शिळ्या कढीला ऊत आणत असून त्याचा काहीच अर्थ नाही, असं म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे मनसेला टोला लगावला आहे.

### आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटरवर

**» राज्यातील आरोग्य व्यवस्था ही व्हेंटिलेटरवर गेलेली आहे. पुण्यातील ससून असो की जळगाव, नाशिक येथील परिस्थिती. वर्षभराचं हाफकीनचं २२६ कोटींचं बिल आरोग्यमंत्र्यांनी वेळेत दिल असतं तर त्या-त्या संबंधित रुग्णालयाला औषध पुरवठा झाला असता आणि हे बळी गेले नसते, असं मत सुषमा अंधारे यांनी व्यक्त केलं आहे. त्या पुढे म्हणाल्या की, हे बळी शासकीय हलगर्जीपणामुळे गेलेले असून आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे. हे सर्व सुरू असताना काही जण शिळ्या कढीला ऊत आणत असून त्याचा काहीच अर्थ नाही, असं म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे मनसेला टोला लगावला आहे. तीस लाखांची गाडी घेणारा व्यक्ती फिरू शकतो तर तो ५० ते ३० रुपयांचा टोलही भरू शकतो.**

तीस लाखांची गाडी घेणारा व्यक्ती फिरू शकतो तर तो ५० ते ३० रुपयांचा टोलही भरू शकतो. सध्या आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. तो मुद्दा आम्हाला सोडायचा नाही. सरकारचा तो मुद्दा डायव्हर्ट करू द्यायचा नाही. त्यासंबंधीचा मुद्दा काही कंत्राटदार डायव्हर्ट करून सरकारला मदत करत आहेत, असंही अंधारे म्हणाल्या.

# मावळ लोकसभेसाठी मनसेने दंड थोपटले!

## निवडणूक पूर्ण ताकदीने लढायची आणि जिंकायची; मनसेचा निर्धार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

शिरूर आणि मावळ लोकसभा मतदारसंघाची २०२४ ची लोकसभा निवडणूक पूर्ण ताकदीने लढायची आणि जिंकायची असा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. मावळ व शिरूर लोकसभा मतदार संघाची बैठक रणजित शिरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मनसे नेते अमेय खोपकर, महेश जाधव, सिने अभिनेते व मावळ लोकसभेचे संघटक रमेश परदेशी व पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. अमेय खोपकर म्हणाले, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जास्तीत जास्त आमदार येणाऱ्या विधानसभेमध्ये निवडून आले पाहिजेत. आपला



भगवा त्या ठिकाणी फडकला पाहिजे. महाराष्ट्रातील विविध समस्यांना वाच्या फोडण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित काम करावे. रणजित शिरोळे म्हणाले, पिंपरी विधानसभा चिंचवड विधानसभा, कर्जत विधानसभा, पनवेल विधानसभा, उरण विधानसभा, व मावळ विधानसभा यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मोठी ताकद आहे. मनसैनिकांनी एक दिलाने एक जोमाने कामाला लागावे मनसेचा हक्काचा खासदार निवडून येईल. बाबू वागस्कर म्हणाले, शिरूर मतदारसंघामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ताकद मोठ्या प्रमाणात आहे. पुढील भवितव्य खूप चांगले आणि मोठे आहे. पक्षाचे संघटन मोठ्या प्रमाणात चांगलं झालेला आहे, अजून जोमाने कामाला लागावे. शिरूर मतदार संघाची बांधणी चांगली करा शिरूर मतदार संघात खासदार हा मनसेचा झाला पाहिजे. अजय शिंदे म्हणाले, भोसरी विधानसभा शिरूर मतदार संघासाठी निर्णायक आहे यासाठी शहरातील नागरिकांच्या ज्या समस्या असतील, त्याला वाच्या फोडण्याचे काम महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केले आहे. शिरूर व मावळ लोकसभा संघाची

### मनसेचा खासदार निवडून येईल

» महाराष्ट्रातील विविध समस्यांना वाच्या फोडण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित काम करावे. रणजित शिरोळे म्हणाले, पिंपरी विधानसभा चिंचवड विधानसभा, कर्जत विधानसभा, पनवेल विधानसभा, उरण विधानसभा, व मावळ विधानसभा यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मोठी ताकद आहे. मनसैनिकांनी एक दिलाने एक जोमाने कामाला लागावे मनसेचा हक्काचा खासदार निवडून येईल. शिरूर मतदारसंघामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ताकद मोठ्या प्रमाणात आहे. असे बाबू वागस्कर म्हणाले.

बांधणी आढावा बैठक घेत असताना पिंपरी विधानसभा, भोसरी विधानसभा,व चिंचवड विधानसभा, या तिन्ही विधानसभा सुमारे तीनशे जणांचा पक्षप्रवेश करण्यात आला. ११ नव्याने शाखाध्यक्ष नेमण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष सचिन चिखले, उप शहराध्यक्ष राजू सावळे, विशाल मानकरी, बाळा जाणवले, विभाग अध्यक्ष दत्ता देवतरसे, मयूर चिंचवडे, अंकुश तापकीर, विद्यार्थी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष, हेमंत डांगे, अनिकेत प्रभू, महिला सेनेचे अध्यक्ष सीमा बेलापूरकर, रुपेश पटेकर , महावीर कर्णावर, सचिन शिंगाडे विनोद भंडारी, संगीता देशमुख, अनिता पांचाळ, सुशांत साळवी, जयसिंग भाट, श्रद्धा देशमुख उपस्थित होते.

# लोकाभिमुख तंत्रज्ञान संस्कृती विकसित करण्याची गरज!

## विकासाच्या दृष्टीने विज्ञान-तंत्रज्ञानाचे महत्व : डॉ. शेखर मांडे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

भारताच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या जी-२० परिषदेत 'सायन्स-२०' च्या पाच बैठका झाल्या. विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग करून शाश्वत विकासाचे उद्दिष्ट्य गाठण्याच्या दृष्टीने वैज्ञानिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उहापोह केला. चांगल्या भवितव्यासाठी स्वच्छ ऊर्जा, वैश्विक स्तरावर सर्वांगीण आरोग्य आणि लोकाभिमुख विज्ञान-तंत्रज्ञान संस्कृती विकसित करण्यावर भर देण्याची आवश्यकता आहे, असा सूर वैज्ञानिकांच्या परिसंवादात उमटला. विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र विभाग, भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी (इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी-इनसा) आणि भारतीय उष्णप्रदेशीय



हवामानशास्त्र संस्था (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरॉलॉजी-आयआयटीएम) यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायन्स-२०' बैठकीतील चर्चांवर आधारित परिसंवादाचे मंगळवारी आयोजन केले होते. 'शाश्वत विकासासाठी विज्ञान, तंत्रज्ञान व इनोव्हेशनला पोषक वातावरणनिर्मिती' अशी या परिसंवादाची मध्यवर्ती संकल्पना होती.

या निमित्ताने विविध संशोधन संस्थातील वैज्ञानिक एकाच व्यासपीठावर आले होते. पाषाण रस्त्यावरील आयआयटीएम संस्थेत झालेल्या परिसंवादाच्या उद्घाटनावेळी नालंदा विद्यापीठाचे माजी कुलपती व ज्येष्ठ संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमीचे अध्यक्ष डॉ. आशुतोष शर्मा (दोघेही ऑनलाईन) विज्ञान भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शेखर मांडे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरोलॉजीचे संचालक डॉ. आर. कृष्णन, नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशनचे डॉ. अरविंद रानडे, इंडियन नॅशनल सायन्सचे कार्यकारी संचालक डॉ. ब्रजेश पांडे, विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र विभागाचे अध्यक्ष डॉ. योगेश शौचे, सचिव डॉ. मानसी माळगावकर आदी उपस्थित

### या मान्यवरांची होती उपस्थिती

» नालंदा विद्यापीठाचे माजी कुलपती व ज्येष्ठ संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमीचे अध्यक्ष डॉ. आशुतोष शर्मा विज्ञान भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शेखर मांडे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरोलॉजीचे संचालक डॉ. आर. कृष्णन, नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशनचे डॉ. अरविंद रानडे, इंडियन नॅशनल सायन्सचे कार्यकारी संचालक डॉ. ब्रजेश पांडे, विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र विभागाचे अध्यक्ष डॉ. योगेश शौचे, सचिव डॉ. मानसी माळगावकर आदी उपस्थित होते.

होते. पदवी अभ्यासक्रम शिकणारे विद्यार्थी, फॅकल्टी सदस्य, संशोधक, शास्त्रज्ञ व विज्ञानप्रेमी मोठ्या संख्येने या परिसंवादात उपस्थित होते. डॉ. शेखर मांडे म्हणाले, वसुधैव कुटुंबकम हा विचार घेऊन भारताने यशस्वीरीत्या जी-२० चे आयोजन केले. विकासाच्या दृष्टीने विज्ञान-तंत्रज्ञानाचे महत्व यासंदर्भात 'सायन्स-२०' अंतर्गत अनेक मुद्यांवर चर्चा झाली. त्यात प्रामुख्याने शाश्वत विकास आणि त्यात तंत्रज्ञानाचे योगदान यावर उहापोह झाला. या चर्चेतून अनेक प्रस्ताव मांडण्यात आले असून, आगामी काळात त्यावर काम होईल. तंत्रज्ञान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे, हेही यामध्ये अधोरेखित झाले आहे.

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक ७ ऑक्टोंबर २०२३। पान ५


# वाघिरे टॉवर्स सोसायटीधारकांचा ड्रेनेजचा प्रश्न सुटला!

## ड्रेनेज लाईन, काँक्रिटीकरणाचे काम सुरू; आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नेहरुनगर येथील वाघिरे टॉवर्स सोसायटीच्या रस्त्यावरील काँक्रेटिकरण आणि ड्रेनेजलाईचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे परिसरातील सुमारे दीड हजार रहिवाशांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे स्थानिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार हे काम हाती घेण्यात आले. त्याचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. यावेळी वाघिरे टॉवर्स सोसायटीचे चेअरमन तुषार वाघिरे, सामाजिक कार्यकर्ते फारुक इनामदार, अशोक देशमुख, जावेद इनामदार, विजय जमदाडे, अजय जुनावणे, सचिन शिंदे, मंगेश कुलकर्णी आदी स्थानिक नागरिक उपस्थित होते. तुषार वाघिरे म्हणाले की, वाघिरे टॉवर्स नेहरूनगर सोसायटी मधील काँक्रिटीकरण आणि अंतर्गत संपूर्ण ड्रेनेज लाईनच्या कामाचे भूमिपूजन करण्यासाठी आमदार लांडगे यांना विनंती करण्यात आली होती. या सोसायटीमध्ये सुमारे १३० सदनिका आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून सोसायटीधारकांना विविध पायाभूत सोयी-सुविधांच्या समस्या होत्या. त्याबाबत आमदार लांडगे यांनी सकारात्मक पुढाकार घेतला आहे. काँक्रिटीकरण आणि ड्रेनेजलाईनचे काम महिन्याभरात पूर्ण होईल. आमदार लांडगे यांच्या माध्यमातून नेहरुनगर, उद्यमनगर, अजमेरा या भागात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत.



> “भोसरी विधानसभा मतदार संघातील सोसायटीधारक, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही कायम प्राधान्य दिले आहे. सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आम्ही नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात केली होती. त्यामुळे सोसायटीधारकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून पूर्णवेळ अधिकारी नियुक्त केला आहे. नागरी समस्यांबाबत सोसायटीधारकांनी ‘परिवर्तन हेल्पलाईन- ९३७९९ ०९०९०’ वर संपर्क करावा आणि आपली तक्रार नोंदवावी. त्या सोडवण्यासाठी आम्ही तत्पर आहोत.
>
> - **महेश लांडगे**, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.


